# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा मार्च २०२४ च्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत.

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर दिनांक २७/०५/२०२४ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने मार्च २०२४ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना **मंगळवार दिनांक ११/०६/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार असून माध्यमिक शाळांमार्फत त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येणार आहे. याबाबत विभागीय मंडळांमार्फत सर्व माध्यमिक शाळांना सूचित करण्यात आलेले आहे.

याबाबत विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व संबंधित मुख्याध्यापक/विद्यार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

दिनांक:- ०४/०६/२०२४

क्र.कोविम/माध्य.परीक्षा/735
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक ०५/०६/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त शाळा
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय: माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा मार्च २०२४ च्या गुणपत्रिका व इतर साहीत्य वाटपाबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा मार्च २०२४ च्या गुणपत्रिका व इतर साहीत्य वाटप दिनांक ११/०६/२०२४ रोजी स.१०.०० ते दू.०२.३० या वेळेत आपल्या संबंधित वितरण केंद्रावर वितरण केले जाणार आहे.याची नोंद घेवून उपरोक्त प्रकटनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर